

मुकुल माधव विद्यालय : येथील विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रदर्शनाची पाहणी करताना डॉ. शा. ब. मुजुमदार व इतर.

# मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे ही पालकांचीही जबाबदारी - मुजुमदार

**पुणे** - मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे ही शिक्षकांबरोबरच पालकांचीही जबाबदारी आहे. वर्ण, जातीभेद या क्षुल्लक गोष्टी आहेत. फक्त आत्मविश्वास ही एकच महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन पद्मभूषण डॉ. शा. ब. मुजुमदार यांनी केले. रत्नागिरी येथे मुकुल माधव विद्यालयाच्या चौथ्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून सिंबायोसिस कॉलेजच्या संचालिका डॉ. विद्या येरवडेकर, मुकुल माधव फाउंडेशनचे संस्थापक विश्वस्त प्रल्हाद छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, आनंद पंडित, एस. के जैन, सौरभ धानोरकर, संजय आशर, अतिरिक्त पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर, अतिरिक्त जिल्हाधिकारी अजित पवार आदी उपस्थित होते. यावेळी पाहुण्याच्या हस्ते अर्शद सारंग, शिवम पांड्ये, सोहम महाडिक, दिशा लांजेकर यांच्यासह यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.